::प्रेस नोट::

दिनांकः– २०/०१/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ |
| गुन्हा नोंद क्रमांक | पोलीस स्टेशन महागांव जिल्हा यवतमाळ अप क्र. ०२८/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) कलम ७ |
| आलोसे नांव व कार्यालय | **आलोसे क्र. १)** मनोज रमेश भालेराव,वय ३०वर्ष पद लेखापाल (वर्ग–३)<br>**आलोसे क्र. २)** शेख मोसीन शेख महमंद,वय ३७वर्ष पद कनिष्ठ लिपीक (वर्ग–३) दोन्ही नेमणुक नगर पंचायत कार्यालय,महागांव ता.महागांव जि. यवतमाळ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे कंत्राटदार असुन त्यांनी महागांव येथील प्रभाग क्रमांक ११ व १६ विंधन विहीरीवर बसविलेल्या मोटर पंप व इतर साहित्य बसविण्याचे काम केले होते. या कामाचे देयक मंजुर करुन देण्याकरीता त्यांना नगर पंचायत महागांव येथील लेखापाल व लिपीक लाचेची मागणी करीत असल्याने त्यांनी अ.क्र.ब्यु. कार्यालय, यवतमाळ येथे तक्रार दिली होती.<br>तक्रारीची शासकीय पंचासमक्ष दिनांक १९/०१/२०२१ रोजीच्या पडताळणी करण्यात आली असता, आ.लो.से. क्र.१) मनोज रमेश भालेराव, वय ३० वर्ष पद लेखापाल (वर्ग–३) आ.लो.से. क्र.२) शेख मोसीन शेख महंमद, वय ३७ वर्ष पद कनिष्ठ लिपीक (वर्ग–३) दोन्ही नेमणुक नगर पंचायत कार्यालय, महागांव यांनी पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना महागांव येथील प्रभाग क्रमांक ११ व १६ मधील विंधन विहीरीवर बसविलेल्या मोटारपंप व इतर साहित्यांचे देयक मंजुर करुन देण्याकरीता तडजोडीअंती ५,०००/– रुपये लाचेची मागणी केली व लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन दिनांक २०/०१/२०२१ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आ.लो.से.क्र.२) शेख मोसीन शेख महंमद कनिष्ठ लिपीक यांना स्वतःकरीता व आ.लो.से.क्र. १) मनोज रमेश भालेराव, लेखापाल यांचेकरीता ५,०००/– रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले असुन, वर नमुद आलोसे विरुध्द वरील प्रमाणे गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. तपास सुरु आहे. |

लाचलुचत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आव्हाण करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबददम तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– दगडी ईमारत, टांगा चौक तहसिल कार्यालयाजवळ यवतमाळ

संकेतस्थळ :– acbmaharastra.gov.in

ईमेल :– dyspacbytl@gmail.com

अप्लीकेशन :– acbmaharastra.net

टोल फ्रि क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०७२३२–२४४००२


(गजेंद्र क्षिरसागर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ